# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,

३०२, वेक फिल्ड हाऊस,३ रामजला, ब्रिटानियारेस्टोरंटजवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई-४००००१.

दुरध्वनीक्र.०२२-२२६९४९८५/८४ Email:ccfmangrove@mahaforest.gov.in /ccfmmumbai@gmail.com


**विषय:-** कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या ३३ व्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/ ०२ /२०२४-२५

फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: 01/04/25

प्रति,

१. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई.
३. मा. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे/नवी मुंबई.
४. मा. पोलीस अधिक्षक, ठाणे (ग्रा)रायगड/पालघर/रत्नागिरी/सिंधुदुर्ग (पोलीस उप अधिक्षक व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
५. मा. आयुक्त, महानगरपालिका बृहन्मुंबई/ठाणे/कल्याण-डोंबिवली/मिरा-भाईंदर/वसई-विरार/नवी मुंबई /पनवेल/ भिवंडी- निजामपूर/ उल्हासनगर (उपआयुक्त व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
६. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे.
७. मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर (विभागीय वन अधिकारी व त्यावरील दर्जाचे अधिकारी)
८. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA)
९. मा. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO)
१०. मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA)
११. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (SRA)
१२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)
१३. मा. संचालक, पर्यावरण तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)
१४. मा. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
१५. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्रिय अधिकारी.
१६. उप वनसंरक्षक (कांदळवन कक्ष), मुंबई.
१७. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.
१८. नवी मुंबई एन्व्हारमेंट प्रिझर्वेशन सोसायटी.
१९. श्रीमती. हेमा रमाणी, बॉम्बे एन्व्हारमेंट ऍक्श्न ग्रुप.
२०. श्री. स्टॅलिन डी, वनशक्ती (NGO)
२१. महाराष्ट्र मच्छिमार कृती संघ यांचे प्रतिनिधी
२२. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
२३. उप मीठ आयुक्त, मीठागरे विभाग, मुंबई (विशेष निमंत्रित)

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र.कक्ष-१/कांदळवन समिती/२०५/सन २०२४-२५, दि.०७.०२.२०२५.

उपरोक्त संदर्भान्वये कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **३३ वी** बैठक मंगळवार, **दि.२५.०२.२०२५** रोजी **मा. विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली** घेण्यात आली होती.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. तरी, कृपया अवलोकन होणेस विनंती आहे.

(अक्षय गजभिये, भा.व.से)
सदस्य सचिव,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

सोबत : बैठकीचे इतिवृत्त.

## कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची ३३ वी बैठक
## दिनांक २५.०२.२०२५ रोजीचे इतिवृत्त

समितीचे विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, कोकण विभाग तसेच समितीचे अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा सह-अध्यक्ष, कांदळवन कक्ष यांच्या अध्यक्षतेखाली कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीची **मा. विभागीय आयुक्त यांचे दालनात, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई** येथे ३३ वी बैठक पार पडली. समितीच्या सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा.अध्यक्ष, मा.सह-अध्यक्ष यांच्या अनुमतीने समितीच्या कामकाजास सुरुवात झाली. सदर बैठकीस खालील नमूद अधिकारी व कर्मचारी व्यक्तीश: अथवा व्हि. सी. द्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | डॉ.विजय सुर्यवंशी, भा.प्र.से. | मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन यांचे कार्यालय |
| २. | श्री. एस. व्ही. रामाराव, भा.व.से. | मा. सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ३. | श्री.अक्षय गजभिये, भा.व.से. | सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक | कांदळवन कक्ष, मुंबई |
| ४. | श्रीमती कांचन ज्ञानोबा पवार | विभागीय वन अधिकारी | मुंबई कांदळवन संधारण घटक, दक्षिण कोकण |
| ५. | श्री. दिपक खाडे | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.द्वारे) | मुंबई कांदळवन संधारण घटक, उत्तर कोकण |
| ६. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर |
| ७. | श्री.प्रदीप रा.तावरे | जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय प्रतिनिधी (सहा.अधीक्षक) | जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर |
| ८. | श्री.दिनेश पैठणकर | जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कार्यालय प्रतिनिधी (नायब तहसिलदार) | जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे |
| ९. | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालय प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी |
| १०. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदूर्ग |
| ११. | श्री.सुभाष भागडे | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| १२. | निवासी उपजिल्हाधिकारी | निवासी उपजिल्हाधिकारी (व्ही.सी.द्वारे) | जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड |
| १३. | श्री.निलेश पोतदार | अवर सचिव (व्ही.सी.द्वारे) | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १४. | श्री.विशाल मदने | अवर सचिव तथा वैज्ञानिक -२ | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| १५. | श्री. आनंद बिल्लाडे | कोस्टल ऑफिसर | MCZMA |
| १६. | सौ.गिरिजा देसाई | विभागीय वन अधिकारी (व्ही.सी.व्दारे) | चिपळूण |
| १७. | श्री.स्टॅलिन डी | संचालक | वनशक्ती (NGO) |
| १८. | श्री. अजय वानखेडे | उपयोजनाकार | सिडको |

| | | | |
|---|---|---|---|
| १९. | PCC Head Office | PCC, Head Office यांचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | PCC, Head Office |
| २०. | श्री. गोरड, पोलिस निरिक्षक | Police Inspector Security and Cyber Branch (व्ही.सी.द्वारे) | पालघर |
| २१. | पोलिस अधिक्षक (S P) | पोलिस अधिक्षक, कार्यालय याचे प्रतिनिधी (व्ही.सी.द्वारे) | रत्नागिरी |
| २२. | श्री. पुंडलिक मिराशे | सल्लागार (पर्या.) | MIDC, अंधेरी |
| २३. | श्री. वैभव शेलार | सहा.वास्तुशास्त्रज्ञ, प्रा.का. | MIDC, महापे. |
| २४. | श्री.अजिंक्य पाटील | कक्ष अधिकारी, पर्या | नमुंमुपा |
| २५. | श्री. भरत शिवाजी ढेंबरे | पोलिस उपनिरिक्षक | Commissioner of Police, सुरक्षा शाखा, ठाणे |
| २६. | सौ. स्मिता गुरव | नायब तहसीलदार | अपर तहसीलदार कार्यालय, मिरा भाईंदर |
| २७. | श्री.दिनकर ग. शिळवटे | सहा. पोलिस आयुक्त | मुंबई शहर |
| २८. | श्री. अभिजीत भुजबळ | पोलिस निरीक्षक | सुरक्षा शाखा, रायगड |
| २९. | श्री. शेखर साटम | अधिक्षक | परि.२, कोपरखैरणे |
| ३०. | श्री. राजेश कवडे | महसूल सहायक | अपर तहसिलदार,मिरा- भाईंदर |
| ३१. | S.K. Thakore | Dy. Superintendent of Salt | Salt Department |
| ३२. | श्री. सुनिल काठोळे | सहा. आयुक्त | नवी मुंबई महानगरपालिका |
| ३३. | श्री.अनिल वि. पंडित | प्रकल्प कार्यकारी | BOMBAY ENVIRONMENT ACTION GROUP |
| ३४. | श्री. संदीप कोवले | पोलिस उपनिरीक्षक | मिरा भाईंदर, पोलिस आयुक्तालय |
| ३५. | पंकज गोंगे | E. E. (SWM) | |
| ३६. | सुनिल जाधव | नायब तहसिलदार | SDO Office, पनवेल |
| ३७. | पवन चंदक | (SDO) तहसिलदार, पनवेल | SDO Office, पनवेल |
| ३८. | मयुर भुजबळ | ACP, Turbhe | Navi Mumbai, CPO |

टिप :- व्हि.सी.व्दारे उपस्थित सदस्य यांचे नाव व कार्यालय यांचा बोध होत नसल्याने वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेले आहे.

| अ.क्र | विषय | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | कांदळवन क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करणेबाबत चर्चा. | |

| अ.क्र. | जिल्हा | शासकीय विभाग | क्षेत्र (हेक्टर) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | सिंधुदूर्ग | महसूल | ३४.५३ | व्हि.सी.व्दारे उपस्थित सिंधुदूर्ग जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी उर्वरित ३४.५३ हेक्टर कांदळवन क्षेत्र वन विभागाकडे वर्ग करण्यात येईल असे सांगितले. |
| २. | पालघर | महसूल | १०१८.५८ | मा.सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी पालघर जिल्ह्यातील महसूल विभागाच्या अख्यतारेतील एकूण १२७७.५८ हेक्टर क्षेत्रापैकी वन विभागास २५९ हेक्टरचा ताबा देण्यात आला आहे व अजून २१३ हेक्टर कांदळवन क्षेत्राची पडताळणी झालेली असून उर्वरित कांदळवन क्षेत्राचे पुन्हा सर्वेक्षण करण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर सूचना देण्यात आल्याचे सांगितले. |
| ३. | रायगड | JNPA | ७०.३३ | या संदर्भात मा.सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी रायगड जिल्ह्यातील JNPA कडील ७०.३३ हेक्टर क्षेत्र हस्तांतरीत करणे बाकी असून याबाबत JNPA यांनी त्यांचे स्तरावरून केंद्र सरकार (GOI) कडून संमती (Consent) घेवून सदरहू क्षेत्र कांदळवन विभागास हस्तांतरीत करणेबाबत तात्काळ कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल समितीच्या पुढील बैठकीपूर्वी करणेत यावे असे निर्देश दिले. |
| ४. | ठाणे | महसूल व इतर | ४४७.६८ | मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी ठाणे जिल्ह्यात महाराष्ट्र रिमोट सेंन्सीग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) या संस्थेकडील सन २००५ या कालावधीतील कांदळवन दर्शक नकाशे व कांदळवन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्या निरीक्षणाव्दारे काही कांदळवन क्षेत्र ठाणे जिल्ह्यातील इतर शासकीय / निमशाकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून वन विभागास (कांदळवन कक्ष) ४४७.६८ हेक्टर हस्तांतरीत करण्यासाठी शिल्लक असल्याचे बैठकीत सांगितले तसेच, त्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कार्यालयास दि. १३ फ़ेब्रुवारी, २०२५ पत्रान्वये त्याबाबत कळविण्यात आले असून सदर हस्तांतरणाबाबत त्वरीत कार्यवाही होणेकरिता मा.सह अध्यक्ष यांनी बैठकीत संबंधितांना निर्देश दिले. |
| ५. | मुंबई, शहर | महसूल व इतर | ६८.५० | मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी मुंबई शहर जिल्ह्यात महाराष्ट्र रिमोट सेंन्सीग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) या संस्थेकडील सन २००५ या कालावधीतील कांदळवन दर्शक नकाशे व कांदळवन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्या निरीक्षणाव्दारे काही कांदळवन क्षेत्र ठाणे जिल्ह्यातील इतर शासकीय / निमशाकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून वन विभागास (कांदळवन कक्ष) ६८.५० हेक्टर हस्तांतरीत करण्यासाठी शिल्लक असल्याचे बैठकीत सांगितले तसेच, त्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयास दि. १३ फ़ेब्रुवारी, २०२५ पत्रान्वये त्याबाबत कळविण्यात आले असून सदर हस्तांतरणाबाबत त्वरीत कार्यवाही होणेकरिता मा.सह अध्यक्ष यांनी बैठकीत संबंधितांना निर्देश दिले. |
| ६. | मुंबई, उपनगर | महसूल व इतर | २७५.१३ | मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी मुंबई उपनगर जिल्ह्यात महाराष्ट्र रिमोट सेंन्सीग ॲप्लिकेशन सेंटर (MRSAC) या संस्थेकडील सन २००५ या कालावधीतील कांदळवन दर्शक नकाशे व कांदळवन विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी / कर्मचारी यांच्या निरीक्षणाव्दारे काही कांदळवन क्षेत्र ठाणे जिल्ह्यातील इतर शासकीय / निमशाकीय / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून वन विभागास (कांदळवन कक्ष) २७५.१३ हेक्टर हस्तांतरीत करण्यासाठी शिल्लक असल्याचे बैठकीत सांगितले तसेच, त्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या कार्यालयास दि. १३ फ़ेब्रुवारी, २०२५ पत्रान्वये त्याबाबत कळविण्यात आले असून सदर हस्तांतरणाबाबत त्वरीत कार्यवाही होणेकरिता मा.सह अध्यक्ष यांनी बैठकीत संबंधितांना निर्देश दिले. |
| | | एकूण | १९२९.३२ | |

२. कोकण विभागातील सर्व (७) सागर तटीय जिल्ह्यातील समितीकडे Offiline पध्दतीने प्राप्त झालेल्या तक्रारींचा निपटारा करणेबाबत चर्चा.

मा. सह अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी ऑफलाईन तक्रारींबाबत जिल्हास्तरीय कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समित्यांनी त्यांचे अधिनस्त असणा-या जुन्या ऑफलाईन ५५ तक्रारीचे अवलोकन करुन तक्रारनिहाय कार्यवाहीचा पुर्नलागवड अहवाल विभागीय स्तरावरील समितीसमोर पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या. जेणेकरुन सदर तक्रारींचा निपटारा होणे शक्य होणार असल्याचे सांगितले.

| जिल्हा | ऑफ़लाईन प्रलंबित तक्रारी |
|---|---|
| ठाणे | 18 |
| मुंबई उपनगर | 19 |
| पालघर | 9 |
| रायगड | 9 |
| **Total** | **55** |

३. Mangorve Suraksha App वरील प्राप्त तक्रारींच्या स्थळपाहणीसाठी तारीख व स्थळपाहणी अहवाल विहित प्रारुपात ॲपवर अपलोड करणे व त्यानुषंगाने कार्यवाही करणेबाबत चर्चा

| District | Total Complaint | Open Complaint | Close Complaint | Pending for giving date to site inspection | Pending for uploading site inspection report | Pending for uploading action taken report |
|---|---|---|---|---|---|---|
| Mumbai City | 19 | 3 | 16 | 0 | 2 | 3 |
| Mumbai suburban | 162 | 44 | 118 | 1 | 40 | 44 |
| Palghar | 63 | 33 | 30 | 1 | 13 | 33 |
| Raigad | 77 | 28 | 49 | 2 | 24 | 28 |
| Ratnagiri | 5 | 0 | 5 | 0 | 0 | 0 |
| Sindhudurg | 9 | 3 | 6 | 2 | 3 | 3 |
| Thane | 175 | 33 | 142 | 0 | 27 | 33 |
| **Total** | **510** | **144** | **366** | **6** | **109** | **144** |

दि.२४.०२.२०२५ अखेर Mangrove Suraksha App वर प्राप्त तक्रारीबाबत मा.सह अध्यक्ष यांनी याबाबत असे निर्देश दिले की, ज्या तक्रारीबाबत स्थळपाहणीकरिता तारीख दिल्या नाहीत त्या तातडीने देणेत याव्यात व ज्या तक्रारीचा स्थळपाहणी अहवाल APP वर Upload केल्या नाहीत त्याबद्दल तात्काळ कार्यवाही करावी आणि ज्या तक्रारीबाबत कार्यपूर्ती अहवाल (Action Taken Report) Mangrove Suraksha App वर Upload केलेले नाहीत अशा तक्रारीबाबत संबंधित विभागाने म्हणजेच महसूल, वन व इतर विभागाने यावर तात्काळ कार्यवाही करावी.

<table>
<tr>
<td>४.</td>
<td>मा. अध्यक्ष व मा.सह-अध्यक्ष यांनी मागील बैठकीत दिलेल्या सूचना.</td>
<td>मा. सह-अध्यक्ष तथा अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी डेब्रिज हटवण्याकरिता आवश्यक निधी कोणत्या स्त्रोतातून उपलब्ध करुन घेता येईल अथवा विभागीय स्तरावरील जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत निधी उपलब्ध होईल किंवा कसे ? याबाबत मा.अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांच्याशी चर्चा अथवा बैठक घेऊन त्यानूसार सदर प्रस्ताव शासन स्तरावरील मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर ठेवण्यात येईल असे सांगितले.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हा</th><th>कार्यवाही करणारी संबंधित यंत्रणा</th><th>संबंधित यंत्रणांकडून समितीस प्राप्त खर्चाचे अंदाजपत्रक कोटीत</th></tr>
<tr><td>१.</td><td>मुंबई, उपनगर</td><td>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे कार्यालय</td><td>रु. ७.५८ कोटी</td></tr>
<tr><td rowspan="2">२.</td><td rowspan="2">ठाणे</td><td>मिरा -भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालय</td><td>रु. ७.१२ कोटी</td></tr>
<tr><td>ठाणे, महानगरपालिका यांचे कार्यालय</td><td>रु. ६४.०४ कोटी</td></tr>
<tr><td>३.</td><td>पालघर</td><td>जिल्हाधिकारी, पालघर यांचे कार्यालय</td><td>रु. २५.११ कोटी</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>रु. १०३.८७ कोटी</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>५.</td>
<td>पोलिस यंत्रणेमार्फत दाखल केलेल्या गुन्ह्याच्या तपासाबाबत सद्यस्थिती व त्या गुन्हयामध्ये शिक्षा झालेल्या प्रकरणांबाबत आढावा.</td>
<td>मा. सह अध्यक्ष यांनी कांदळवन संरक्षणबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीवरुन पोलीस यंत्रणेमार्फत गुन्हे नोंदविले जातात त्यामध्ये किती गुन्ह्यांमध्ये शिक्षा झालेली आहे. या गुन्हाच्या तपासाबाबतची सद्यस्थितीबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करणेबाबत सूचना दिल्या.</td>
</tr>
</table>

( एस.व्ही.रामाराव, भा.व.से. )
सह अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष

( डॉ. विजय सूर्यवंशी, भा.प्र.से. )
अध्यक्ष,
कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग